दैनिक
# महावृत्त
R.No.MAHMAR/25/A3029
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ११२ मंगळवार दि.११ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## बकवास बंद करा, उत्तर द्या!:आरएसएस रजिस्टर्ड आहे का? निधी कुठून येतो? प्रकाश आंबेडकरांचा संघावर हल्लाबोल

जालना– वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयं सेवक संघावर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत संघाला उद्देशून तीन प्रश्न उपस्थित केले आहेत. आरएसएस रजिस्टर्ड संस्था आहे का? नसेल, तर इतके फंडिंग कसे काय मिळत आहे? तसेच संघाने भारतीय तिरंगा स्वीकारला नव्हता, हे खरे आहे की खोटे? असा सवाल आंबेडकरांनी उपस्थित केला आहे.प्रकाश आंबेडकरांनी ट्विट करत म्हटले की, इकडची तिकडची बकवास बंद करा आणि माझ्या तीन प्रश्नांचे उत्तर द्या. आरएसएस ही नोंदणीकृत संघटना आहे का? जर ती नोंदणीकृत नसेल, तर तिला कोट्यवधी रुपयांचा निधी कसा मिळत आहे? हे खरे नाही का की आरएसएसने भारतीय ध्वज स्वीकारला नाही? हे खरे नाही का की आरएसएसने अनेक दशकांपासून नागपूर येथील मुख्यालयात तिरंगा फडकवला नाही? हे खरे नाही का की गोळवलकर आणि सावरकर यांनी बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले समतावादी, लोकशाहीवादी आणि धर्मनिरपेक्ष संविधान नाकारले आणि मनुस्मृतीला संविधान बनवण्याची मागणी केली? असे प्रश्न आंबेडकरांनी उपस्थित केले आहेत.

वंचित बहुजन आघाडी आणि त्यांचे सर्व कार्यकर्ते आता आरएसएस आणि मनुवादी शक्तींना तोंड देण्यासाठी एकत्र आले आहेत. तुम्ही आणि तुमच्या अर्ध्या अंतर्वस्त्रांच्या टोळीने एक गोष्ट समजून घेतली पाहिजे, आपला देश मनुस्मृतीने नव्हे तर बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाने चालेल, असेही प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

ओबीसींच्या राजकीय लढ्याला सुरुवात दरम्यान, आज प्रकाश आंबेडकर यांची जालना येथे जाहीर सभा झाली. यावेळी बोलताना त्यांनी राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर भाष्य केले आहे. आज धर्म नव्हे तर ओबीसी धोक्यात आहेत. ओबीसी सत्ताधारी झाल्याशिवाय आरक्षण वाचणार नाही. ओबीसींच्या राजकीय लढ्याला सुरुवात झाली आहे, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.



जालना येथे जाहीर सभेत ते बोलते होते. जरांगे मुंबईत ठिय्या मांडून बसले आणि काँग्रेस, भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीचे १९० आमदार जरांगेंच्या दर्शनाला गेले. हेच आमदार देवेंद्र फडणवीस यांना भेरले तशी फडणवीस यांची भाषा बदलली, अशी टीका आंबेडकरांनी केली आहे.

फडणवीस हा जीआर रद्द करणार आहेत का?पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, जे आमदार जरांगे यांना भेटले तेच आमदार जरांगे काय म्हणतात ते ऐकण्याचा मुख्यमंत्री फडणवीस यांना सल्ला दिला आणि कुणबी प्रमाणपत्राचा जीआर निघाल, असा आरोप आंबेडकरांनी केला आहे. तसेच देवेंद्र फडणवीस हा जीआर रद्द करणार आहेत का? असा सवालही त्यांनी विचारला आहे.

प्रत्येक मतदारसंघामध्ये एक तरी ओबीसी मतदार हवा आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने प्रकाश आंबेडकर म्हणाले, ओबीसींनी मोठ्या प्रमाणात आपले उमेदवार जाहीर केले पाहिजेत. प्रत्येक मतदारसंघामध्ये एक तरी ओबीसी मतदार असायला हवा. काही मतदारसंघ एससी प्रवर्गासाठी राखीव आहेत. काही मतदारसंघ एसटीसाठी राखीव आहेत. एसी आणि एसटी हा वर्ग आरक्षणवादी आहे. हे लक्षात घ्यायला हवे. जे लोक आरक्षणवादी आहेत, त्यांनाच मतदान करायला हवे. आपल मत हे ओबीसीला, आपले मत हे एसटीला असायला हवे, असे आवाहन आंबेडकरांनी केले आहे.

ओबीसी नेत्यांच्या नाड्या तिसऱ्याच्या हातात पुढे बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, धर्म नाही तर ओबीसी संकटात आला आहे. ओबीसी सत्ताधारी झाल्याशिवाय आरक्षण वाचणार नाही. ओबीसी नेत्यांच्या नाड्या तिसऱ्याच्या हातामध्ये आहेत. कळसूत्री बाहुल्याप्रमाणे हे ओबीसी नेते नाचवले जात आहेत, असे म्हणत प्रकाश आंबेडकरांनी ओबीसींनी राजकारणात उतरावे, असेही आवाहन केले आहे.

## मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची मोठी घोषणा ; राज्यातील शाळांमध्ये 'वंदे मातरम' सक्तीचे करणार

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यातील शाळांमध्ये 'वंदे मातरम' सक्तीचे करण्याची घोषणा केली आहे. गोरखपूर याठिकाणी एका कार्यक्रमादरम्यान, मुख्यमंत्र्यांनी राज्यातील प्रत्येक शाळेत वंदे मातरम सक्तीचे करण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यावेळी,राज्यातील प्रत्येक शाळेत वंदे मातरम सक्तीचे केले जाईल असे त्यांनी म्हटले. हे तेच लोक आहेत जे लोहपुरुष सरदार पटेल यांच्या जयंतीला उपस्थित राहत नाहीत परंतु जिना यांच्या सन्मानार्थ आयोजित कार्यक्रमांना उपस्थित राहतात. वंदे मातरमला विरोध करण्याचे कोणतेही औचित्य नाही; वंदे मातरमला असा विरोध करणे हे भारताच्या फाळणीतील दुर्दैवी घटक होते. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, १५० व्या जयंतीनिमित्त आजपासून एकता कार्यक्रम सुरू झाले आहेत. ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय स्तरावर साजरा करता येईल. पंतप्रधान मोदी आल्यावर त्यांनी ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सांगितले की ४०३ विधानसभा मतदारसंघांमध्ये एकता यात्रा सुरु होत आहे. वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रम सुरू झाले आहेत. एकता आणि अखंडतेला धक्का देणाऱ्या शक्तींना आपण ओळखून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, जेणेकरून कोणताही जिना पुन्हा जन्माला येऊ नये. संपूर्ण देशाला अभिमान वाटतो मुख्यमंत्र्यांनी यावेळी, संपूर्ण देश भारतमातेचे महान सुपुत्र सरदार वल्लभभाई पटेल यांची १५ वी जयंती साजरी करत आहे. स्वातंत्र्यानंतर, आपल्या स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करणे अटलबिहारी वाजपेयींच्या काळात शक्य झाले. हे कार्यक्रम राष्ट्रीय एकात्मतेचे घटक बनले असेही त्यांनी यावेळी म्हटले. दरम्यान, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर, ३१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली.

## लातूर ग्रामीण मधील १५ अंगणवाडी इमारत बांधकामासाठी १ कोटी ६८ लाखाचा निधी

लातूर :– – ग्रामीण विधानसभा मतदार संघातील १५ नवीन अंगणवाडी इमारतीच्या बांधकामासाठी भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी ६८ लक्ष रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत २९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे. सदरील निधी मंजूर झाल्याने दुरावस्था झालेल्या अंगणवाड्याचे रूपडे बदलणार आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील अंगणवाड्याची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करण्यात यावे याकरिता भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला. आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील १५ ठिकाणच्या अंगणवाडीचे नव्याने इमारत बांधकामासाठी १ कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. प्रत्येक अंगणवाडीला ११ लक्ष २५ हजार रुपये एवढा निधी प्राप्त होणार असून या निधीतून दुरावस्था झालेल्या अंगणवाडीचे स्वरूप बदलून अत्यंत देखणी इमारत उभी राहणार आहे.

जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मंजुरी मिळालेल्या १५ ठिकाणच्या नवीन अंगणवाडी इमारत बांधकामात लातूर तालुक्यातील ६, रेणापूर तालुक्यातील ३ आणि भादा सर्कल मधील ६ अंगणवाडीचा समावेश आहे. त्यात लातूर तालुका – शिऊर क्रमांक दोन, चिंचोली ब क्रमांक एक, खुलगापूर क्रमांक दोन, मुरुड क्रमांक चार, मुरुड क्रमांक दहा, रेणापूर तालुक्यातील – सेलू खुर्द, कामखेडा, सुकणी आणि भादा सर्कल मधील रिंगणी क्रमांक एक, वडजी क्रमांक एक, भादा क्रमांक तीन, शिवली क्रमांक तीन, वरवडा क्रमांक एक, समदर्गा येथील अंगणवाडीच्या नवीन इमारतीच्या बांधकामासाठी मान्यता मिळाली आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी विविध गावातील अंगणवाडीच्या नवीन इमारती बांधकामासाठी १ कोटी ६८ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल त्या त्या गावातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह अंगणवाडीच्या मदतनीस, सेविका आणि पालकांनी आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## लातूरमध्ये शेरे हिंद टिपू सुलतान यांच्या २७५ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

### नुरानी फाऊंडेशनतर्फे निवेदन सादर; भावी नगरसेवक





लातूर /प्रतिनिधी :– लातूर येथील नुरानी फाऊंडेशन, बालाजी नगर यांच्या वतीने येत्या २० नोव्हेंबर रोजी शेरे हिंद टिपू सुलतान यांच्या २७५ व्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम परिसरातील ग्रीन बेल्ट येथे होणार असून, त्यासाठीची तयारी जोरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बालाजी नगर आणि परिसरातील पथदिवे, सुशोभीकरण व स्वच्छता महानगरपालिकेमार्फत करण्यात यावी, अशी मागणी नुरानी फाऊंडेशन तर्फे करण्यात आली. यासाठीचे निवेदन भावी नगरसेवक मयूर बनसोडे यांच्या पुढाकाराने मनपाआयुक्त मानसी मीना, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे तसेच विद्युत विभाग प्रमुख जयंत ताकपीरे यांना सादर करण्यात आले.

या वेळी भावी नगरसेवक मयूर बनसोडे,फाऊंडेशनचे अध्यक्ष समीर भाई शेख, सोहेल भाई देशमुख, राहुल भाऊ गायकवाड, नदीम शेख, आवेज हामदुले, इमरान शेख, इकबाल सय्यद, अमर गायकवाड, गुलश कांबळे, कैलास सुरवसे, विनोद दांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महार वतन जमीन घोटाळ्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी


परभणी :– १० नोव्हेंबर रोजी पुण्यातील महार वतनाच्या जमिनीवरील घोटाळ्याच्या निषेधार्थ परभणी येथे युवक काँग्रेसतर्फे तीव्र धरणे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन 'आंदोलन भूमी' येथे आयोजित करण्यात आले होते, जिथे कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचा निषेध व्यक्त केला. यानंतर आंदोलनातून निघालेल्या पदयात्रेदरम्यान घोषणा देत जिल्हाधिकारी परभणी यांच्यामार्फत राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर करण्यात आले, ज्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा आणि महार वतन जमीन घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यात यावी, व ट्रॉसिटी या कलमांतर्गत कुणाची नोंद सुद्धा करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले की, पार्थ पवार यांनी आंबेडा कंपनीच्या माध्यमातून पुण्यातील महार वतनातील जमिनीचे मोठ्या प्रमाणात व्यवहार करून आर्थिक घोटाळा केल्याचा आरोप आहे. या गंभीर प्रकरणात सरकारकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने युवक काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलनकर्त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, अनुसूचित समाजाच्या ऐतिहासिक हक्कांच्या जमिनींवर अन्याय होऊ देणार नाही. दोषींवर गुन्हे दाखल करून निष्पक्ष चौकशी होईपर्यंत युवक काँग्रेसचा लढा सुरू राहील. आंदोलनाचे नेतृत्व अमोल जाधव जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस यांनी केले. या वेळी वैजनाथ देवकते, प्रदीप सोनटक्के, सुहास पंडित, इरफान जमीनदार, सुदर्शन कदम, अंगद सोगे, सत्तार पटेल, शजी अहमद खान, नितीन रनेर, अतिश गरड, ॲड. सय्यद एजाज, शेख नाजेम, रामेश्वर कुरे, आसिफ पटेल, मारुती चव्हाण, जयराम डुकरे, कैलास टेकाळे, रोहिदास बोबडे, शिवाजी भालेराव, वामनराव बोबडे, शेख फहीम, पठाण असलम यांच्यासह युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## पार्थ पवार जमीन घोटाळा प्रकरण:हिंमत असेल तर तुकाराम मुंढेच्या नेतृत्वात चौकशी करा, नाना पटोलेंचे मुख्यमंत्र्यांना आव्हान

भंडारा– उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळ्याप्रकरणी चौकशी केली जाणार आहे. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात चौकशी समिती गठित करावी, असे आव्हान काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केले आहे. नाना पटोले म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी विकास खरगेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. या पद्धतीच्या चौकशीचा आणि कमिटीचा फार्स करून जनतेची जी दिशाभूल चाललेली आहे. महाराष्ट्र रोज लुटण्याचे काम सुरू आहे. तुमच्यात खरोखरच हिंमत असेल आणि दूध का दूध, पाणी का पाणी करायचे असेल तर तुकाराम मुंढेंच्या अध्यक्षतेखाली कमिटी बसवा, असे आव्हान केले आहे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, पार्थ पवारांच्या १८०० कोटींच्या जमीन घोटाळ्यात औद्योगिक नवीन धोरण आणायचे आणि स्टॅम्प ड्युटी वाचवण्याचे धोरण ही फक्त एक पद्धत आहे. मुंबई आणि बीकेसी मधील ५०० एकर पेक्षा अधिक जमीन, सी लिंकच्या बाजूची जमीन, रस्ते विकास महामंडळाची जमीन, या सगळ्या जमिनी कशा आणि काय भावाने दिल्या? नवी मुंबईचे मार्केट यार्ड होते, ती जमीन मोदीजींच्या मित्रांना आयटी पार्कच्या नावाने देण्यात आली.



असे सगळे सुरू असताना राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात की ही गंभीर बाब आहे. महाराष्ट्रात अशा अनेक प्रकारच्या जमीन घोटाळ्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्याची चौकशी बसवण्याची गरज नाही, ते कागदावरच स्पष्ट होते. शासन तुम्ही चालवत आहात, सरकार तुम्ही चालवत आहात, अशा वेळेस चौकशी बसवायची गरजच काय? असा प्रश्न नाना पटोले यांनी उपस्थित केला आहे. पार्थ पवार यांच्या कंपनीने पुण्यातील मुंढव्यातील १८०० कोटींची जमीन ३०० कोटींमध्ये लाटण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी असलेली २१ कोटींची स्टँप ड्युटीही भरली नाही. हे प्रकरण समोर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अतिरिक्त मुख्य सचिव विकास खरगे यांच्या नेतृत्वाखाली चौकशी समिती स्थापन केली आहे. यावरून नाना पटोले यांनी टीका केली आहे.

महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## निवडणूक बिहारची, कसोटी दिल्लीची!

उमेश कुमार बिहार विधानसभा निवडणुकीने दिल्लीचंही राजकीय पारडं हलवून टाकलं आहे. पहिल्या टप्प्याच्या मतदानानंतर राजधानीत बैठकींचा धडाका सुरू झाला आहे. सत्ताधारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या चेहर्यांवर चिंता स्पष्ट दिसतेय. सत्तेच्या आशा-अपेक्षांमध्ये दिल्लीच्या कानाकोपर्यांत अचानक निर्माण झालेली ही हालचाल लक्षवेधी आहे. या बैठकांचं सूत्र दिल्लीतील 'राजकीय चाणक्य'च्या हातात आहे, जे प्रत्येक नेत्याकडून सतत फीडबॅक घेत आहेत आणि त्यावर आधारित तातडीने निर्णय घेतले जात आहेत.

बिहारमधील पहिल्या टप्प्याचे मतदान संपल्यानंतर लागलीच दिल्लीमध्ये अंदाज आणि तर्कांची कुजबुज सुरू झाली. अनेक नेते थेट दिल्लीला रवाना झाले आणि त्यांनी आपापल्या वरिष्ठांना ग्राऊंड रिॲलिटीची माहिती दिली. सर्वच पक्षांच्या मुख्यालयांत गुणाकार, विश्लेषण आणि खर्या चित्राचा अंदाज बांधण्याचे काम सुरू आहे. काही नव्या घटनांमुळे बिहारच्या राजकारणाची दिशा बदलताना दिसतेय. राजदमध्ये बंडखोरी करून जनशक्ती जनता दल (जजद) स्थापन करणारे लालू प्रसाद यादव यांचे मोठे पुत्र तेजप्रताप यादव पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. केंद्र सरकारने त्यांना अचानक वाय प्लस सुरक्षा दिली आहे आणि ही घोषणा पहिल्या टप्प्याच्या मतदानानंतर लगेच झाली.

केंद्राचा हा निर्णय केवळ सुरक्षा कारणासाठी नसून, तो एक स्पष्ट राजकीय संदेश मानला जातो. याआधी उत्तर प्रदेशच्या निवडणुकीदरम्यान असदुद्दीन ओवैसींनाही अशाच प्रकारे सुरक्षा देण्यात आली होती. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, तेजप्रताप यांना मिळालेली ही सुरक्षा फक्त योगायोग आहे का, की एखादे नियोजित राजकीय पाऊल? तेजप्रताप यादव यांनी या निवडणुकीत २२ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. त्यांच्या समर्थकांचा दावा आहे की, किमान ४ ते ५ जागा ते जिंकतील; पण कितीही जागा मिळाल्या, तरी नुकसान आरजेडीलाच होणार. कारण, त्यांच्या बहुतेक उमेदवारांनी लालू-राबडींच्या पारंपरिक मतदारसंघांमध्ये स्पर्धा उभी केली आहे. तेजप्रताप यांनी नुकतेच म्हटले होते की, यावेळचा 'किंगमेकर' मीच असेन. हे विधान त्यांच्या आत्मविश्वासाचे आणि महत्त्वाकांक्षेचे द्योतक आहे. केंद्राने त्यानंतरच त्यांची सुरक्षा वाढवली. हे योगायोग नसल्याचं अनेकांचं मत आहे.

दिल्लीतील रणनीतिकारांचं मत आहे की, तेजप्रतापांचा मतशेअर ३-४ टक्के झाला, तर त्याचा थेट तोटा आरजेडीला आणि अप्रत्यक्ष फायदा एनडीएला होईल. म्हणूनच दिल्लीच्या गलियार्यांमध्ये त्यांच्या 'महत्त्वा'बद्दल कुजबुज सुरू आहे. अर्थात, हे पहिल्यांदाच नाही की, दिल्लीच्या राजकारणाने पाटण्यातील समीकरण बदलले आहे. २०१० मध्येही नितीश कुमार यांनी भाजपसोबतची आघाडी तोडण्यापूर्वी दिल्लीचे इशारे पाहिले होते; पण यावेळी खेळ अधिक गुंतागुंतीचा आहे. बिहारमधील लढत काट्याची आहे. कोण आघाडीवर आहे, याबाबत कोणीही ठाम सांगू शकत नाही. दोन्ही आघाड्यांचे नेते विजयाचे दावे करत असले, तरी आंतरिक चिंतेची पातळी उंच आहे. त्यामुळेच दिल्लीतील बैठकांचं सत्र अखंड सुरू आहे. प्रत्येक बूथचा हिशेब, जातीय समीकरणं आणि मतदानाच्या ट्रेंडस्वर बारकाईने विश्लेषण सुरू आहे.

नितीश कुमार यांच्या अलीकडील राजकीय हालचालींनी केवळ जेडीयूमध्येच नव्हे, तर संपूर्ण आघाडीत हलचल निर्माण केली आहे. त्यांच्या काही 'गुप्त बैठकां'मध्ये वरिष्ठ नेते लल्लन सिंह आणि संजय झा यांना बोलावण्यात आले नाही; मात्र त्यांच्या विश्वासू सल्लागार मनीष वर्मा आणि काही वरिष्ठ अधिकार्यांसोबत ते सातत्याने ग्राऊंड रिपोर्टस्वर काम करत आहेत. हे दर्शवते की, नितीश या वेळी पूर्णपणे 'सिस्टम मोड'मध्ये आहेत. ते केवळ पक्ष संघटनावर नाही, तर प्रशासनिक यंत्रणा आणि इंटेलिजन्स रिपोर्टस्वर अवलंबून आहेत. दिल्लीमध्ये दोन मतप्रवाह आहेत. एक म्हणतो, नितीश भाजपासोबतचे अंतर वाढवत आहेत, जेणेकरून निकालानंतर त्यांच्याकडे 'पर्याय' राहतील. दुसरा वर्ग मानतो की, ते स्वतःची राजकीय ओळख वाचवण्यासाठी वेगळा मार्ग शोधत आहेत.

पहिल्या टप्प्यानंतर भाजपलाही धक्का बसला आहे. त्यामुळे पक्षाने रातोरात प्रचार धोरण बदलले. आधी फक्त 'मोदी-शहां'च्या पोस्टर्सवर भर होता. आता 'मोदींसोबत नितीश' अशी जोडी पुन्हा प्रमुख ठरली आहे. हेच दिल्लीतील चिंतेचं प्रतीक आहे. कारण, भाजपला ठाऊक आहे की, नितीश नाराज झाले, तर मतदारसंघ तुटू शकतो. तेजप्रताप यादव यांचा नव्या पक्षाचा प्रयोग, नितीश कुमार यांची रणनीतिक रूपांतरणे आणि भाजपचा प्रचारातील 'यू-टर्न' या तिन्ही घटना सांगतात की, बिहारची निवडणूक ही केवळ राज्याची नाही, तर दिल्लीच्या सत्तेचीही कसोटी आहे. यंदा बिहारमध्ये 'लोकल विरुद्ध नॅशनल' असा संघर्ष स्पष्ट झाला आहे. दिल्लीतील राजकीय कथा थेट गावागावांत पोहोचत आहेत, तर बिहारमधून मिळणार्या रिपोर्टस्नी दिल्लीच्या राजकीय समीकरणांना हादरे बसत आहेत. केंद्र सरकारसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेचा विषय बनली आहे. नितीश कुमार आणि भाजप यांच्यातील नाते आता 'थंड' न राहता उघडपणे 'दुराव्याचे' रूप घेत आहे. भाजपमधील काहींचे म्हणणे आहे की, जर निकाल अपेक्षेप्रमाणे आला नाही, तर त्याचा धक्का थेट केंद्राला बसेल. तेजप्रताप यादव लहान खेळाडू वाटत असले, तरी प्रत्यक्षात ते आता 'पॉवर बॅलेंसर' म्हणून उभे राहिले आहेत. त्यांनी ३-४ जागा जिंकल्या, तरी त्याचा फटका महागठबंधनला बसेल. दिल्लीतील सूत्रधार या युक्तीला 'सॉफ्ट इंजिनिअरिंग' म्हणतात, जिथे थेट हस्तक्षेप न करता निवडणुकीचे संतुलन बदलले जाते. दिल्लीतील रणनीतिकारांना ठाऊक आहे की, बिहारमधील निकाल काहीही असो, त्याचे परिणाम थेट केंद्राच्या सत्तेसाठी निर्णायक ठरतील. त्यामुळे प्रत्येक पाऊल मोजून टाकले जात आहे. केंद्रीय यंत्रणांची सक्रियता, नेत्यांची वाढलेली सुरक्षा आणि सतत सुरू असलेल्या बैठका हे सगळं दाखवून देतं की, बिहारचे रण आता दिल्लीच्या धडधडीचे केंद्र बनले आहे. पाटण्याच्या रस्त्यांवरून उठलेली ही राजकीय आरोळी दिल्लीच्या भिंतींवर आपटते आहे आणि प्रत्येकजण विचारतोय, 'कोण जिंकेल बिहार?' कारण, त्या उत्तरावरच ठरणार आहे, दिल्लीची खुर्ची कोणाची राहील आणि कोणाची डगमगेल?

# सुलक्षणा पंडित आणि संजीव कुमार : प्रेम जे शब्दांत कधी आलंच नाही

बॉलीवूडच्या झगमगाटात असंख्य प्रेमकथा उमलल्या, काही फुलल्या, काही कोमेजल्या पण काही अशा होत्या ज्या कधी सुरुवात झाली की शेवट हेच कळलं नाही. अशीच एक कथा गाण्यांइतकी मधुर पण शेवटपर्यंत न उच्चारलेली म्हणजे सुलक्षणा पंडित आणि संजीव कुमार यांचं प्रेम. सुलक्षणा पंडित या अतिशय सुंदर आणि मधुर आवाज असलेल्या अभिनेत्री आणि गायिकेचं संजीव कुमारवर प्रेम होतं, तिने त्यांना प्रपोज देखील केलं होतं पण संजीव कुमारचा जीव हेमा मालिनीवर जडला असल्याने त्यांनी सुलक्षणा पंडित यांना नकार दिला. आयुष्यात कधी, केव्हा, कोण कोणाला का आवडेल किंवा का आवडणार नाही, हे सांगणं अतिशय कठीण आहे! प्रेमाची व्याख्या तशी कुणाला करता आलीच नाही!



सत्तरच्या दशकात सुलक्षणा पंडित हे नाव गायकीत झळकत होतं. घराणं संगीतमय पंडित परिवारात जन्मलेली सुलक्षणा ही स्वर आणि अभिनयाचा संगम आणि सुरांच्या दुनियेत वाढलेली. त्याच काळात संजीव कुमार म्हणजे अभिनयातील एक विद्यापीठच! कोशिश, आंधी, शोले, आणि अनामिका सारख्या चित्रपटांनी त्यांना अभिजात उंची गाठून दिली होती. दोघांची भेट झाली एका चित्रपटाच्या निमित्ताने व्यावसायिक ओळखीतून हळूहळू एक भावनिक नातं आकार घेत गेलं. सुलक्षणाच्या मनात संजीवसाठी एक आदर, एक आकर्षण आणि एक प्रेम निर्माण झालं, जे तिनं कधीही लपवलं नाही. सुलक्षणा पंडित यांनी अनेक मुलाखतींमध्ये स्पष्ट सांगितलं मी संजीव कुमार यांना मनापासून प्रेम केलं. त्यांचं प्रेम एकतर्फं होतं, पण शुद्ध आणि निखळ होतं. संजीव कुमार मात्र त्यांच्या आयुष्यात हेमा मालिनीसाठीचं आपलं प्रेम घेऊन फिरत होते आणि ते प्रेमही अधुरं राहिलं. एकाच्या हृदयात दुसऱ्याचं नाव, आणि तिसऱ्याच्या मनात वेदनेचा प्रवाह. या त्रिकोणात सुलक्षणाचं आयुष्य हळूहळू विरघळत गेलं. सुलक्षणाच्या आवाजात अनेक गाणी होती, पण काही गाणी जणू तिच्या स्वतःच्या भावना गात होती, सुरांत जपलेलं प्रेम जसे तू इस तरह से मेरी जिंदगी में शामिल है हे गाणं जरी चित्रपटासाठी रेकॉर्ड झालं, तरी प्रत्येक ओळीमध्ये तिच्या अधुऱ्या प्रेमाची जाणीव होती.



संजीव कुमार मात्र त्यांच्या शांत, अंतर्मुख स्वभावामुळे कधीच काही बोलले नाहीत. पण त्यांच्या डोळ्यांत ती गहन वेदना आणि न बोलेले शब्द दिसायचे, जे फक्त सुलक्षणासारख्या संवेदनशील मनालाच जाणवले असतील. संजीव कुमार शेवटपर्यंत अविवाहित राहिले. त्यांच्या निधनानंतर सुलक्षणा पंडित कोलमडून गेल्या. त्यांनीही पुन्हा लग्न केलं नाही आणि अनेक वर्षं एकाकीपणात जगल्या. त्यांच्या मनात एकच सत्य कायम होतं. जे प्रेम कधी मिळालं नाही, तेच खरं होतं. त्यांची अधूरी कहाणी, पण अमर नातं. ही कथा ना पत्रांत लिहिली गेली, ना गाण्यांत पूर्ण झाली पण ती भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वांत हृदयस्पर्शी प्रेमकथा ठरली. सुलक्षणा आणि संजीव कुमार यांनी जगाला शिकवलं. प्रेम म्हणजे मिळवणं नाही, तर शांतपणे आठवणीत जगणं होय. त्यांचं नातं काळाच्या पलीकडे गेलं, एकानं गाण्यांतून बोललं आणि दुसऱ्यानं नजरेतून. दोघांनीही जीवनभर मौन पाळलं, पण त्या मौनातही शब्दांपेक्षा गहिरं प्रेम होतंकदाचित सुलक्षणा कालपर्यंत त्या स्वरांत हरवत होती आणि संजीव कुमारच्या स्मितात ती अजूनही उत्तर शोधत होती. प्रेम कधी-कधी संपत नाही, ते फक्त एक सुरात रूपांतरित होतं

सुलक्षणा पंडित यांचं पारिवारिक जीवन कटकटींनी भरलेलं होतं. त्यांचे वडील, दोन्ही काका, (एक काका पंडित जसराज), बंधू प्रसिद्ध संगीतकार जतीन-ललित, मंधीर हा अजून एक भाऊ देखील संगीतकार, एक बहीण सुप्रसिद्ध अभिनेत्री विजयता, तिचा नवरा सुप्रसिद्ध संगीतकार आदेश श्रीवास्तव, चुलत बहीण सुप्रसिद्ध गायिका हेमलता... सारेच संगीत क्षेत्राशी संबंधित असले तरी त्यांचं प्रत्यक्ष जीवन मात्र संगीतमय होऊ शकलं नाही. वडिलांनी दुसरा विवाह केला आणि या परिवाराला गरिबीचे दिवस आले. त्यांनी गायन सुरु केलं. हळूहळू अभिनय क्षेत्रातही उतरल्या. दोन्ही क्षेत्रात त्यांनी नाव कमावलं. पण आईचं, मोठ्या भावाचं निधन, सिनेसृष्टीत अपेक्षित यश न मिळणं, अपघात (बाथरूममध्ये पाय घसरून पडणं) अशा अनेक घटनांनी त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक आघात केले. संजीव कुमारसाठी त्या कायम अविवाहित राहिल्या! त्यांच्या अपुऱ्या प्रेम कहाणीसाठी 'सरस्वती चंद्र' चित्रपटातील गीतकार इंदीवर यांनी लिहिलेल्या आणि लता मंगेशकर यांनी गायलेल्या या ओळी आठवतात.

तन से तन का मिलन हो न पाया तो क्या
मन से मन का मिलन कोई कम तो नहीं
खुशबू आती रहे दूर से ही सही
सामने हो चमन कोई कम तो नहीं
चाँद मिलता नहीं सबको सँसार में
है दिया ही बहुत रोशनी के लिए

त्यांच्या जीवनातील संजीव कुमार नावाचा दिया गेला हा दिया गेला आणि त्या डीप डिप्रेशनमध्ये गेल्या!

दिल में ऐसा दर्द छुपा है, मुझसे सहा न जाए
कहना तो चहू अपनों से मई, फिर भी कहा न जाये
आँसू भी आँखों में आये, चुपके से पी जाऊ
जीवन के पिंजरे में, मनन का ये पंछी
कैसे कैद से छूटे
जीना होगा इस दुनिआ में, जब तक साँस न टूटे
दम घुट ता है अब सांसो का, कैसे बोझ उठाऊ
अपने जीवन के इस उलझन को कैसे मैं सुलझाऊ..

उलझन चित्रपटातील हे सुंदर गाणं त्यांचं जीवन झालं! आयुष्यातील उलझन त्या कधीही सोडवू शकल्या नाहीत! ज्या अभिनेत्यावर जीवापाड प्रेम केलं, त्याच्याच मृत्यूच्या दिवशी तिचं निधन व्हावं! किती विलक्षण योगायोग आहे! ६ नोव्हेंबर रोजी संजीव कुमार यांच्या मृत्यूनंतर जवळपास ४० वर्षांनी त्याच तारखेला त्यांचा मृत्यू झाला! प्रतिभासंपन्न अभिनेत्री सुलक्षणा पंडित यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**********

प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# यशस्वी सांगता

गेले पाच दिवस मुंबईत सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाची आज सामोपचाराने सांगता झाली हे चांगले झाले. राज्याचे कॅबिनेट मंत्री विखे पाटील यांच्या नेतृत्वाखालील समितीने आज आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आणि त्यांनी सरकारने ज्या ज्या गोष्टी मान्य केल्या आहेत त्याची लेखी प्रत सादर केली. या ज्या पाच प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये हैदराबाद आणि सातारा तसेच औंध संस्थानांच्या गॅझेटची अंमलबजावणी करण्याची मागणी राज्य सरकारने मान्य केली आहे.

हैदराबाद गॅझेटिअरच्या अंमलबजावणीचा जीआर आज तातडीने काढण्यात आला, पण सातारा गॅजेटच्या संदर्भात काही त्रुटी असल्याने त्याचे निराकरण करून पुढील पंधरा दिवसांत त्याचे अध्यादेश काढले जातील, असे आश्वासन सरकारने दिले आहे. त्यावर जरांगे यांनी पंधरा दिवस नव्हे महिन्याची मुदत देतो; पण त्या अवधीत तोही जीआर निघाला पाहिजे असा आग्रह धरला तोदेखील मान्य झाला.



त्याखेरीज जात दाखल्यांची पडताळणी वेगवान पद्धतीने करावी, त्यासाठी तालुकास्तरावर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी, आंदोलकांवरील सर्व गुन्हे तातडीने मागे घ्यावेत, आंदोलनात मरण पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना सरकारी नोकरी द्यावी, आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, या मागण्यादेखील शासनाने मान्य केल्या आहेत. विखे पाटील यांच्या समितीने यासंदर्भात जो मसुदा तयार केला होता तो मसुदा आंदोलनस्थळी जरांगे पाटील यांनी पॉईंट टू पॉईंट वाचून दाखवला आणि त्यावर उपस्थितांची संमती घेतली.

तसेच विखे पाटील समितीचा मसुदा मराठा समाजाच्या अभ्यासकांनाही पाहणीसाठी दिला गेला. मात्र, या टप्प्यावर आंदोलनस्थळी थोडे विसंगतीचे वातावरण दिसले. एक अभ्यासक या मसुद्यातील काही मुद्द्यांवर आक्षेप घेताना दिसला, पण जरांगे पाटील यांनी त्याला शांत केले. हा मसुदा योग्य आहे, असे तुम्ही आधी म्हणाला होतात आता तुम्हाला यात काहीतरी विसंगती दिसते आहे, तुम्हाला कोणाचा तरी फोन आला त्याचे ऐकून तुम्ही असे बोलत आहात अशा शब्दांत जरांगे यांनी त्या आक्षेप घेणार्या अभ्यासकाची हजेरी घेतल्यानंतर हा विषय तिथेच संपुष्टात आला.

उपस्थित अन्य अभ्यासकांनाही आंदोलनस्थळी या विषयावर बोलण्याची संधी दिली गेली, त्यांनीही हा मसुदा आम्हाला मान्य असल्याचे नमूद केले. मागण्यांच्या संबंधातील जीआर एक तासाच्या आत निघाल्यानंतर ते तपासूनच आम्ही आंदोलन मागे घेण्याचा निर्णय जाहीर करू, असे जरांगे पाटील यांनी जाहीर केले, तोपर्यंत त्यांना भेटायला आलेले मंत्रीही आंदोलनस्थळीच थांबले होते. उभयपक्षी सामंजस्याने समझोता झाल्यानंतर, काही अवधीतच हे जीआर काढले गेले आणि त्याची प्रत जरांगे पाटील यांना दिल्यानंतर गेले पाच दिवस सुरू असलेल्या या आंदोलनाची सांगता झाली.

या जीआरच्या अनुषंगाने जर पुन्हा मराठा समाजाची फसवणूक झाली तर एकाही मंत्र्याला राज्यात फिरू देणार नाही, असा इशाराही याच निमित्ताने दिला गेला. अनेक अर्थाने हे एक अभूतपूर्व आंदोलन ठरले. आंतरवाली सराटी नावाच्या दुर्गम गावातील एका लढवय्या इसमाने आपल्या समाजाच्या मागण्यांसाठी हे अभूतपूर्व आंदोलन करून सार्या देशाचे लक्ष वेधून घेतले. सुरुवातीला या आंदोलकांची मुंबईत कोंडी करण्याचा प्रयत्न झाला. त्यातून आंदोलकांचे खूप हाल झाले. आंदोलन परिसरातील हॉटेल आणि छोटे खाद्यपदार्थ विक्रेते यांना बंदी केली गेली, त्यामुळे पहिल्या दिवशी आंदोलकांची उपासमार झाली.

इतक्या मोठ्या प्रमाणात मुंबईत आलेल्या या आंदोलकांना आंघोळी तसेच स्वच्छतागृहाची व्यवस्था पुरवणे जिकिरीचे ठरले. त्यामुळे या सगळ्या लोकांनी रस्त्यावरच सगळे विधी उरकण्याचा प्रकारही घडला. दक्षिण मुंबईतील जो परिसर उच्चभ्रूंचा समजला जातो तो सगळा परिसर आंदोलकांनी व्यापून टाकला आणि जवळपास मध्य मुंबईतील सगळे व्यवहारच गेले दोन दिवस या आंदोलकांनी ठप्प केले. शेवटी न्यायालयाला यात हस्तक्षेप करून रस्ते मोकळे करण्याचा आदेश द्यावा लागला. त्यानंतर पुन्हा पोलीस प्रशासन आणि आंदोलक यांच्यात संघर्षाची स्थिती उद्भवते की काय अशी शंका निर्माण झाली होती, पण आजच या आंदोलनाची यशस्वी सांगता झाली.

या सगळ्या प्रकारात आंदोलक काही ठिकाणी उन्मादाची वर्तणूक करताना दिसले पण त्यांनाही जरांगे पाटील यांनी वारंवार शांततेचे आवाहन करीत वातावरण नियंत्रणात ठेवले. पोलीस आणि प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची भूमिकाही आंदोलकांनी सुरुवातीपासूनच घेतली होती. त्यामुळे परिस्थिती आटोक्याच्या बाहेर गेली नाही. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबई शहराने खूप पूर्वीपासून अशी अनेक जनांदोलने पाहिली आहेत, पण मुंबईत झालेले मराठा समाजाचे हे आंदोलन मात्र अनेक अर्थाने अनोखे ठरले.

या आंदोलनाने मध्य मुंबईतील रहिवासी नागरिकांचे मोठे हाल झाल्याची ओरड केली गेली; पण अनेक बाबतीत वस्तुस्थिती अशी दिसली की मुंबईतील अनेक नागरिकांनी आणि विविध संघटनांनी उपासमार झालेल्या आंदोलकांना अन्न आणि पाण्याचे वाटप केले. मुस्लीम समाजाच्या विविध संघटनाही मराठा बांधवांना अन्न आणि पाणी पुरवताना दिसल्या. त्यामुळे सामाजिक सलोख्याचे एक वेगळेच दर्शन या निमित्ताने पाहायला मिळाले. आज सरकारने आंदोलकांच्या बहुतांश मागण्या मान्य केलेल्या असल्या तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधीपासून सुरू होणार यावरही बरेच काही अवलंबून असणार आहे.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसीमध्ये समावेश केल्यामुळे ओबीसी समाजही नाराज असू शकतो, त्यांच्या नाराजीचा वेगळा सामना आता सरकारवर करायची वेळ येऊ नये, यासाठी सरकारने वेळीच दुसर्या बाजूशीही समन्वय साधून त्यांना विश्वासात घेण्याची गरज आहे. आरक्षणाची असलेली ५०% मर्यादा ओलांडता येणार नसल्याने मराठा समाजाच्या या मागणीवर नेमका काय तोडगा निघणार याविषयी सगळ्यांनाच उत्सुकता होती; पण आता मात्र सामोपचाराने हा सगळा विषय मार्गी लागला आहे याचे सरकारलाही काही प्रमाणात श्रेय द्यावे लागेल.

# राज्यस्तरीय लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार सन्मान सोहळा मुंबईत संपन्न

मुंबई (प्रतिनिधी) के. एच. हनवते :- समाजातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणारा राज्यस्तरीय लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार सन्मान सोहळा २०२५ हा भव्य कार्यक्रम मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह, मंत्रालय समोर, अत्यंत उत्साहात पार पडला. या सन्मान सोहळ्याचे आयोजन क्रांती ग्राम विकास संस्था व विश्वनायक लोकसंसद फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने, अध्यक्ष सुरेश यादव यांच्या संकल्पनेतून करण्यात आला, कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन समिती, महाराष्ट्र राज्य); अभिनेत्री अलकाताई कुबल, अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, आणि सिनेअभिनेते रोहित कोकाटे, समाजसेवी वरिष्ठ पत्रकार आणि व्यावसायिक : के. रवि (दादा), ड शंकर जी चव्हाण यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार हा भिवंडीचे प्रतिष्ठित उद्योजक मा. छगन पाटील यांना प्रदान करण्यात आला. तसेच राज्यभरातील विविध क्षेत्रांतील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या समाजसेवक, शिक्षक, कलाकार, उद्योजक, पत्रकार, आणि संस्थांना लोकसंसद जनप्रेरणा शिखर पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.





या प्रसंगी सुहासिनी केकाणे, सुरज भोईर, अन्वित दास सीईओ, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, उद्योग, कौशल्य, कृषी, आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजक सुरेश यादव यांनी सर्व उपस्थित मान्यवर, कलाकार, पत्रकार, आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. हा सोहळा नेहरू युवा केंद्र (भारत सरकार) संलग्न क्रांती ग्राम विकास संस्था, बीड यांच्या पुढाकारातून यशस्वीरित्या पार पडला. समाजाला प्रेरणा देणाऱ्या अशा सन्मान सोहळ्यामुळे महाराष्ट्रातील अनेक नवउद्यमी, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुणाईला नवीन दिशा मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## केज येथे तीन दिवसीय कृषी प्रदर्शन संपन्न या कृषी प्रदर्शनास शेतकरी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



केज/प्रतिनिधी केज-धारूर रोड लगत विठाई मंगल कार्यालय येथे तीन दिवसीय कृषी प्रदर्शन उत्साहामध्ये संपन्न झाले असून या कृषी प्रदर्शनास शेतकरी व्यापारी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे असे माध्यमांशी बोलताना आयोजकांनी सांगितले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज येथे प्रथमच कृषिधन,शिंजीर मिल्क ण्ड ग्रो प्रोडयुसर कंपनी केज यांच्या वतीने दिनांक ७ ते ९ या तीन दिवशीय कृषी प्रदर्शन विठाई मंगलकार्यालय येथे कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. तिसऱ्या दिवशी समारोप प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्यासह नगरसेवक व कार्यकर्ते यांनी या कृषी प्रदर्शनास भेट देऊन पाहणी केली, यावेळी त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. या कृषी प्रदर्शनाची सुरुवात शालेय विद्यार्थी यांच्या शोभायात्रा काढून झाली.कृषी प्रदर्शनाची सुरुवात केली होती या तीन दिवसीय कृषि प्रदर्शनास केज तालुक्यासह जिल्ह्यातील आणि बाहेरील जिल्ह्यातील शेतकरी व व्यापारी आणि नागरिकांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला असे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आयोजकांनी म्हटले आहे. केज येथे प्रथमच कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते म्हणून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी ही एक पर्वणी आहे,शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढवता येईल. शेतकऱ्यांना या कृषी प्रदर्शनाचा नक्कीच भविष्यात उपयोग होईल व शेतकऱ्यांनी तंत्रज्ञान अवगत करावे असे या कृषी प्रदर्शनास भेट दिल्यानंतर मध्यम अशी बोलताना हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी मत व्यक्त केले. कृषी प्रदर्शन आयोजक कंपनीचे अभिनंदन करून पुढील वर्षी होणारे कृषी प्रदर्शन हे केज येथे करण्यात यावे अशी मागणी केली असता आयोजकांनीही पुढल्या वर्षी होणाऱ्या कृषी प्रदर्शन हे केज येथेच होईल अशी ग्वाही दिली. या तीन दिवसीय कृषी प्रदर्शनामध्ये केज तालुक्यासह जिल्हयातील सर्व शेतकरी बांधव, महिला बचत गट, शेतकरी गट, व्यवसायीक यांनी या प्रदर्शनामध्ये सहभ नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल आयोजकांच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

## समदु:खी लोकांना त्यांच्या हक्क अधिकाराची जाणीव करून देऊन त्यांना संघर्ष करायला भाग पाडले पाहिजे. बी. बी. मेश्राम १४२ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने ज्या वृक्षाच्या छायेखाली गुण्यागोविंदाने बसावयाचे आहे, त्या छायेच्या फांद्या तोडण्याचा दुष्टपणा करू नका. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८९ व्या वर्धापन दिनानिमित्त या ज्वलंत प्रासंगिक विषयावर १४२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा साकेत नगर येथील संस्थेच्या कार्यालयात ९ नोव्हेंबर २०२५ ला संपन्न झाली.



फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्या एकंदरीत समस्यांच्या अनुषंगाने विचार करता कुणाकुणाला गुण्यागोविंदाने बसवायचे आहे, त्या सर्व एससी, एसटी, ओबीसी व धार्मिक अल्पसंख्यांक अशा सर्व समदु:खी लोकांना एकत्र करून त्यांना त्यांच्या हक्क अधिकाराची जाणीव करून देत असताना त्यासाठी संघर्ष करायला भाग पाडले पाहिजे. शोषितांच्या समस्या, विरोधकांची भूमिका आणि सरकारची जबाबदारी या अनुषंगाने आपण संदर्भासह विश्लेषण केले पाहिजे. जेणेकरून समस्या निर्मूलनाच्या अनुषंगाने पुढील पाऊल उचलता येऊ शकेल. करिता समस्याग्रस्तांच्या अनुषंगाने प्रश्न विचारणाऱ्या माणसांची फळी निर्माण करून लोकशाहीचे पावित्र्य जपले पाहिजे. म्हणून विलायेतेला जाण्यापूर्वी परळ, मुंबई येथे समता सैनिक दलाने आयोजित केलेल्या सभेत बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ज्या वृक्षाच्या छायेखाली गुण्यागोविंदाने बसावयाचे आहे, त्या छायेच्या फांद्या तोडण्याच्या दुष्टपणा करू नका. बलाढ्य शत्रूशी लढा द्यायचा असल्यामुळे आपण ऐक्याने पुढे गेले पाहिजे. अशा अनेक बाबी समजून घेऊन समजावून सांगण्यासाठी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनने सदरील विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना इंद्रानू पेपर प्राडक्ट्सचे मालक उद्योगपती सशिकांत काळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महत्प्रयासाने गावकुसाबाहेरील माणसे गावात राहायला आली असली तरी या अनुषंगाने निरंतरपणे चळवळ चालविल्या गेली नाही, तर पुनश्च इतिहासाची पुनरावृत्ती होऊन गावकुसाबाहेर जायची वेळ येऊ शकते. करिता सदरील विधान हे आपल्यासाठी मार्गदर्शक तत्त्व आहे, ज्याची आपण अंमलबजावणी केली पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय नागसेनवन येथील प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, जो समाज शासन व्यवस्थेत असतो त्याचे शोषण होत नसते. शोषणापासून मुक्त होण्यासाठी एकीने राहणे आवश्यक आहे. एका छत्रछायेखाली शिक्षण घेण्यासाठी पीपल्स एज्युकेशन सोसायटी ही ज्ञानपीठासह विद्यापीठ व्हायला हवी होती. परंतु तसे न झाल्याने छायेच्या फांद्या तोडण्याचा दुष्टपणा केला जात असल्याचे पाहायला मिळत आहे. चायना, जपान सारख्या प्रगत राष्ट्रांनी बुद्धत्वाचा स्वीकार केल्याने त्यांचा विकास झालेला पाहायला मिळतो. तर यापासून जे वंचित आहेत, ते विकासापासून कोसो दूर आहेत. करिता बुद्धत्वाचा स्वीकार करून समाजाच्या पैशाचा वैज्ञानिक दृष्टीने विकासासाठी खर्च करताना कल्याणकारी योजना राबविल्या पाहिजेत.

याप्रसंगी बळीराम किन्हाळकर म्हणाले की, बहुजनांना एकत्र कसे आणता येईल, याचा विचार करून मनपाच्या निवडणुकीत प्रामाणिक प्रतिनिधी सभागृहात पाठविले पाहिजेत. डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, आर्थिक सक्षमतेअभावी चांगली माणसे सुद्धा प्रस्थापित व्यवस्थेला बळी पडतात. दीपक पगारे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाणीवपूर्वक हे विधान केले होते. त्याची प्रचिती आपणाला विविध पक्ष संघटनांच्या गटातटातून पाहायला मिळत आहे. अर्थात ते विधान आजही तंतोतंत लागू पडत आहे. सुभाष ठोकळ म्हणाले की, समाजातील शिकल्या सवरलेल्यानी आपली भूमिका पार पाडण्याऐवजी छायेच्या वृक्षाच्या फांद्याच नव्हे! तर मुळं सुद्धा तोडलेली आहेत. करिता जान आणि भान असणाऱ्यांनी एकत्रित येताना काळाची गरज ओळखून शासनकर्ती जमात बनविण्यासाठी आपली भूमिका पार पाडली पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून फाउंडेशन च्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके तर प्रास्ताविक व आभार प्रा. विलास कटारे यांनी व्यक्त केले.

## केज शहरातील रामकृष्ण नगर येथील सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन नवीन पाईपलाईन व पाण्याच्या टाकीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात-हारुणभाई इनामदार



केज/प्रतिनिधी शहरातील केज-कळंब रोड लगत असलेल्या रामकृष्ण नगर येथील सिमेंट रस्त्याचे व नालीच्या बांधकामाचे भूमिपूजन रविवारी दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११-०० वाजता नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या अध्यतेखाली झालेल्या रामकृष्ण नगर येथील सिमेंट रस्त्याच्या व सिमेंट नाली बांधकामाच्या भूमिपूजन सोहळ्या प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणुन राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार, गटनेते राजूभाई इनामदार, गणेश जगताप, जेष्ठ पत्रकार मधुकर सिरसट, दत्तात्रय गुंड, पत्रकार तात्या गवळी, किरण जोगदंड, शाकेर कुरेशी, डॉ. नौशाद, निखिल बिक्कड,बापू कापरे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी केजच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य घेवून केजचा चेहरा, मोहरा बदलण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे काम केले आसून आगामी निवडणुकीत नागरिकांनी विकास कामे करणारालाच संधी द्यावी आसे आवाहन त्यांनी केले. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, केज शहराची लोकसंख्या वाढलेली आहे सध्या जो पाणीपुरवठा होत तो अपुऱ्या स्वरूपात होत आहे म्हणून आम्ही पाठपुरावा करून नवीन पाईपलाईन सह पाण्याच्या टाक्यांचा प्रस्ताव आता अंतिम टप्प्यात आहे लवकरच या कामाचे उद्घाटन करण्यात येणार आहे असे बोलताना त्यांनी सांगितले आहे. नगराध्यक्षा सौ.ह. सीताताई बनसोड यांनी केज शहरातील महिलाच्या सोईसाठी डिजिटल शौचालय, वीज, लघु शंकेसाठी सार्वजनिक मुताऱ्या व इतर उपक्रम नगर पंचायतीच्या वतीने पूर्ण करण्यात येणार असल्याचे सांगून केजच्या विकासासाठी ६ कोटी ५० लाख निधी जिल्हा नियोजन समिती कडुन मंजूर झाल्याचेही त्यांनी सांगितले. पुढे बोलताना नगराध्यक्षा बनसोड म्हणाले की, शहरातील विविध विकास कामे सध्या प्रगतीपथावर आहेत उर्वरित कामासाठी आम्ही निधी उपलब्ध करण्यासाठी तत्पर आहोत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार मधुकर सिरसट यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार बालासाहेब यादव यांनी मानले. यावेळी वैशाली देशमुख, रामदास देशमुख, मंदाकिनी देशमुख, नवनाथ देशमुख, वनमाला कदम,शेषेराव कदम,धर्मराज यादव, रमेश माने, कालिदास कांबळे, धीरज देशमुख, अनंत कुरुंद, शिवराज जाधव, विजयराजे जाधव, कुंडलिक पोपळघट, विष्णू यादव, प्रमोद देशमुख, दत्तात्रय देशमुख, राजाभाऊ देशमुख, विजय देशमुख, विक्रम देशमुख यांच्या सह या भागातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधि सल्लागार पदी ॲड प्रदिपसिंह गंगणे यांची निवड



लातूर :- महिला आर्थिक विकास महामंडळ कम्युनिटी मॅनेजर रिसोर्स सेंटर कंत्राटी कर्मचारी संघ महाराष्ट्र सलग्न भारतीय मजदूर संघाचे महाराष्ट्र अध्यक्ष श्री गजानन गटलेवार व महामंत्री श्री सुनिल चव्हाण यांचे स्वाक्षरीचे नियुक्ती पत्राद्वारे विधि सल्लागार पदी ॲड प्रदिपसिंह तुळशीदास गंगणे लातूर यांची निवड राज्यातील लोकसंचालित साधन केंद्र कंत्राटी कर्मचारी संघटनेकरिता कायदेविषयक सल्ला,मार्गदर्शन,न्यायिक भूमिका बजावणी करिता करण्यात आलेली आहे. या निवडी बद्दल अध्यक्ष श्री गजानन गटलेवार,उपाध्यक्ष सौ सुजाता तोंडारे,महामंत्री सुनिल चव्हाण,मंत्री सौ पद्मावती गायकवाड,श्री मारोती लोंढे,वित्त मंत्री श्री सुरेश गोंगले,प्रचार व प्रसार मंत्री श्री अजित पाटील,सदस्य सौ अंजली वडगुले,सौ आशा बडोले,सौ कल्पना रसाळ आदींनी निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

## सौ.सरोजनी दादासाहेब ससाणे यांचा चिंचोलीमाळी जि.प.गटात झंजावात गावभेट व गृहभेटीवर भर.



केज/प्रतिनिधी जिल्हा परिषदेची निवडणूक जस जसी जवळ येईल तसतशी उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. शिवसेना शिंदे गटाचे केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने व त्यांच्या पत्नी माजी उप सभापती सौ.सरोजनी दादासाहेब ससाणे हे जोमाने चिंचोली माळी सर्कलमधील गावागावांना भेटी देत आहेत. लोकांच्या अडीअडचणी समजून घेऊन सोडवत आहेत. समाजकारण व राजकारणाचा ताळमेळ जोडून गृहभेटीवर जोर दिला आहे. पंचायत समिती, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन, सिविल हॉस्पिटल, महावीतरण, पंचायत समिती या कार्यालयामध्ये ज्या ज्या लोकांच्या अडी अडचण असतील त्या प्राधान्याने सोडविण्याचे काम ते करत आहेत.या कार्याची पावती म्हणून गावा गावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

चिंचोली माळी जि.प.गटामधील गावागावात त्यांचा दांडगा जन संपर्क आहे. याचा फायदा त्यांना येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये नक्कीच होईल. व वाढता जण संपर्क हा त्यांच्या जमेची बाजू आहे. मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण झाली आहे. तसेच शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना.श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, संसद रत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब, शिवसेना नेते रामदास भाई कदम, शिवसेनेचे सचिव संजयजी मोरे साहेब, उद्योग मंत्री उदय सामंत साहेब, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट साहेब, मराठवाडा संपर्क प्रमुख माजीमंत्री अर्जुनजी खोतकर, मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख सचिन मुळुक तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या जिल्हा परिषद निवडणूक चिंचोली माळी जिल्हा परिषद गटातून सौ. सरोजनी दादासाहेब ससाणे निवडणूक लढवणार आहेत.

## जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंचे विभागीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश

केज/प्रतिनिधी केज शहरातील जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंचे विभागीय मैदानी स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. धनश्री सोनवणे व गौरी उगलमुगले या दोन खेळाडूंचे राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झालेली आहे. दिनांक ११ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट क्रीडा संकुल येथे राज्यस्तरीय स्पर्धा संपन्न होणार आहेत या स्पर्धेत दोन्हीही विद्यार्थी सहभागी होणार आहेत. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी मानवत जि. परभणी या ठिकाणी विभागीय मैदानी स्पर्धा पार पडल्या आहेत. या स्पर्धेमध्ये १४ वर्षीय वयोगटातून मुली मधून कु. धनश्री अर्जुन सोनवणे हिने थाळीफेक मधून प्रथम क्रमांक पटकावला, १७ वर्षीय वयोगटातून मुली मधून कु.घुले पूनम रामेश्वर हिने थाळीफेक या स्पर्धेतून तृतीय क्रमांक पटकावला, १९ वर्षीय वयोगटातून मुलींमधून कु.गौरी सचिन उगलमुगले हिने थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला, चि. अथर्व शिवराज घुले१४ वर्षीय वयोगटातून गोळाफेक या स्पर्धेतून तृतीय क्रमांक पटकावला,चि. रोनक रणधीर ठोके याने १४ वर्षीय वयोगटातून २०० मी.तृतीय क्रमांक पटकाविला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती. या उल्लेखनीय यशामागे क्रीडा मार्गदर्शक श्री.साजेद पठाण सर,भीमाशंकर तोंडसे सर, अश्विनी दळवे मॅडम व किशोर मस्के सर यांचे अथक परिश्रम व मोलाचे मार्गदर्शन ठरले. आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी संस्थेचे सचिव हारूनभाई इनामदार, सहसचिव यासीनभाई इनामदार, मुख्याध्यापक श्री रमाकांत ढाकणे सर,उप मुख्याध्यापक श्री संदीप गुळवे सर बन्सल क्लासेसचे सहसंचालक गोविंद ठोंबरे सर तसेच मुख्याध्यापक बाळासाहेब ठोंबरे सर यांनी सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार यांनी विजेते खेळाडू विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक आणि पालकांचे कौतुक केले. पुढे बोलताना इनामदार यांनी म्हणाले की, या विजेते विद्यार्थी खेळाडू यांच्या जिद्दी व चिकाटीमुळे आमच्या विद्यालयाची मान उंचावत आहे. आमच्या विद्यालयामध्ये




बहुजनांची मुले शिक्षण घेत आहेत परंतु विद्यार्थी शिक्षणासोबत इतरही कलागुणांमध्ये नाविन्यपूर्ण आहेत परंतु पालकांना आपल्या पाल्यांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अथवा स्पर्धेत उतरण्यासाठी पालकांची परिस्थिती फार नाजूक आहे त्याकरता आम्ही स्वतः सर्व विजेते विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी आमच्या संस्थेच्या वतीने व संस्थेच्या स्वखर्चाने स्पर्धेसाठी सर्व खर्च करत आहोत त्या खर्चाचा बोजा पालकांवर येऊ देणार नाहीत असेच आमच्या विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच विविध स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे आणि जिंकावे आम्ही सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तत्पर आहोत. यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना म्हटले की, विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड व जिद्द आणि चिकाटी असणे गरजेचे आहे त्याचबरोबर पालकांनी आपल्या पाल्यांना प्रोत्सन देण्याची ही काळाची गरज आहे व शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. जीवन शिक्षण विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणा बरोबरच इतर मर्दानी खेळाचे शिक्षण देण्यात येत आहे म्हणून तर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे. पुढे बोलताना नगराध्यक्षा बनसोड म्हणाले की, ज्या विद्यार्थ्यांची परिस्थिती हालाखीची असेल अशा विद्यार्थी पालकांनी आमच्याशी संपर्क साधावा आम्ही लागेल ती मदत करून विद्यार्थ्यांना शिक्षणासमवेत त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मदत करू अशी ग्वाही नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी दिली. यावेळी जीवन शिक्षण प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहर भाजपच्या राष्ट्रीय एकता दौडला उत्स्फुर्त प्रतिसाद

## पाच हजारापेक्षा अधिक स्पर्धेकांचा सहभाग; खेळाच्या माध्यमातून एकात्मतेला बळकटी-अजित पाटील कव्हेकर





लातूर/प्रतिनिधीः- देशाचे माजी गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शहर जिल्हा भाजपाच्या वतीने राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. विविध चार गटांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या दौडमध्ये पाच हजारापेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेऊन या दौडला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. देशाची एकात्मता अखंडीत ठेवण्यासाठी क्रिडाक्षेत्राचे मोठे योगदान असून खेळाच्या माध्यमातून एकात्मतेला अधिकची बळकटी मिळते असे सांगत भाजप शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी या एकता दौडला उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याबद्दल स्पर्धकांसह लातूरकरांचे आभार व्यक्त केले.

एक भारत श्रेष्ठ भारत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी देशाचे तात्कालीन गृहमंत्री तथा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी देशातील ५६२ संस्थांने खालसा करत त्यांना भारतात सहभागी करून घेतले होते. त्यांच्यामुळेच निजाम राजवटीतून मराठवाडा मुक्त झालेला होता. त्यामुळेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने आज सोमवार दि. १० नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वा. राष्ट्रीय एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. सदर एकाता दौड विविध चार गटांसाठी आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये वरिष्ठ गट, युवा गट, तरुण गट व बाल गट यांचा समावेश होता. चारही गटातून पाच हजारापेक्षा अधिक स्पर्धकांनी या दौडमध्ये सहभाग नोंदविला. दोन टप्प्यात आयोजित करण्यात आलेली या दौडचा शुभारंभ जेएसपीएम शैक्षणिक संकुल येथून शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शहर निवडणूक प्रमुख अर्चना पाटील चाकूरकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होनराव यांच्यासह विश्वविक्रमी सृष्टी जगताप यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला.

जेएसपीएम शैक्षणिक संकुल ते संत सेवालाल चौक (एक नंबर) ते पुन्हा जेएसपीएम शैक्षणिक संकुल असा तीन किलोमीटरचा एक टप्पा आणि जेएसपीएम शैक्षणिक संकुल ते संविधान चौक ते पुन्हा जेएसपीएम शैक्षणिक संकुल असा सहा किलोमीटरचा दुसरा टप्पा होता. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यासह कर्नाटक राज्यातील व जालना, सोलापूर, बीड, नांदेड या जिल्ह्यातील स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला होता. या एकता दौडच्या वरिष्ठ गटातून पुरुषामधून विकास कातपुरे यांनी प्रथम, नेनाराम कडपासरा यांनी द्वितीय तर किशन चिंचोलवाड यांनी तृतीय क्रमांक पटकावला, वरिष्ठांच्या महिला गटातून विद्या हेच्च यांनी प्रथम, उमा एस.एम यांनी द्वितीय तर बी.सी. पार्वती यांनी तृतीय क्रमांक पटकावला, युवा पुरुष गटातून ऋषीकेश वावरे प्रथम, हणमंत पवार द्वितीय तर पंकज राठोड तृतीय, महिला गटातून पुष्पा राठोड प्रथम, मयुरी वाघमारे द्वितीय तर नैना वाघमारे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

तरुण विद्यार्थी गटातून कृष्णा पडळे प्रथम, शुभम मुलांडे द्वितीय तर रोहित कापसे तृतीय, तसेच तरुण विद्यार्थीनी गटातून श्रावणी जगताप प्रथम, दिव्या राठोड द्वितीय तर रुपाली मुंडे तृतीय क्रमांक मिळविला. बाल मुलांच्या गटातून ओमसाई वाडेकर प्रथम, अनिकेत सगर द्वितीय, ओमसाई करुडकर तृतीय तर बाल मुलींच्या गटातून सादिया सय्यद प्रथम, विद्या होळकर द्वितीय तर समिक्षा वेरुळे हिला तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. या विजेत्यांना शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, निवडणूक प्रमुख अर्चना पाटील चाकूरकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होनराव, शहर जिल्हा सरचिटणीस रागिणी यादव, निखील गायकवाड, संजय गिर, प्रविण कस्तुरे यांच्या हस्ते पारितोषक देण्यात आले. यावेळी अजित पाटील कव्हेकर म्हणाले की, एक भारत श्रेष्ठ भारत ही संकल्पना मांडून देशाची एकात्मता अखंड ठेवण्यासाठी देशाचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान अविस्मरणीय आहे. त्यांच्यामुळेच मराठवाडाही निजाम राजवटीतून मुक्त होऊन तो भारतात सहभागी झाला. देशाची एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सातत्याने पुढकार घेतला असून याकरीता त्यांनी आपले विचारही वेळोवेळी देशापुढे मांडलेली आहेत. क्रिडा क्षेत्राच्या माध्यमातून एकात्मतेला अधिक बळकटी मिळते असे सांगून खेळाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी खेळाडूंसह नागरीकांनी आपले योगदान द्यावे असे आवाहन केले.

यावेळी निवडणूक प्रमुख अर्चना पाटील चाकूरकर, प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होनराव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मंडल अध्यक्ष निर्मला कांबळे, सुरेश जाधव, राहुल भुतडा, काकासाहेब चौगुले, विशाल हवापाटील, रोहित पाटील, गोपाळ वांगे, सचिन सुरवसे यांच्यासह युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, महिला मोर्चा अध्यक्षा शितल मालु, पवन अल्टे, प्रमोद गुडे, उपाध्यक्ष श्रीकांत राजंणकर, प्रा. उदय देशपांडे, गणेश गोमचाळे, अस्मिता काटे आदींसह भाजप पदाधिकारी, स्पर्धक, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकाता दौड यशस्वी करण्यासाठी जेएसपीएम शैक्षणिक संस्थेच्या क्रिडा विभागाने परिश्रम घेतले.

# विश्वधर्मी मानवता तीर्थभवनातून निघणारा संदेशच जगाला विनाशापासून वाचवेल - डॉ. विश्वनाथ कराड

## विश्वशांतीची महागाथा व सुवर्णपिंपळ ग्रंथाचे प्रकाशन

लातूर : - भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम् व एकं सत् विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे. विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातूनच जगात शांती नांदेल अशी श्रध्दा आणि पूर्ण निष्ठा आहे. असे विचार विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी व्यक्त केले. विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर रुई यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे यांच्या लेखणीतून विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा या संकल्पनेवर आधारीत 'विश्वशांतीची महागाथा' व संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या संघर्षमय जीवनाचं सुंदर आख्यान महाकादंबरी 'सुवर्णपिंपळ' या ग्रंथांचे प्रकाशन विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रगतशील शेतकरी काशीराम दा. कराड, डॉ. हनुमंतराव कराड, वरिष्ठ सल्लागार गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, डॉ. राऊत आणि योगेश पारखी उपस्थित होते.



डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, सध्या संपूर्ण जगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सर्व सुख सुविधांसह झालेली पराकोटीची भौतिक प्रगती असूनसुद्धा दुसरीकडे हिंसा, रक्तपात, द्वेष, गोंधळ, अराजकता, जातीधर्मातील तेढ, देशांच्या सीमा या सारख्या क्षुल्लक कारणांमुळे अत्यंत संशय, भिती व तणावाचे वातावरण निर्माण झालेले दिसून येते. आशा वेळेस रामेश्वर रुई येथे उभारण्यात आलेल्या विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनातून संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देण्यात येत आहे. गिरीश दाते म्हणाले, विज्ञानाच्या पायावर उभे राहून अध्यात्माचा दिवा पेटवणारे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांना स्वामी विवेकानंदांच्या तत्वधारेचा शेला बांधून विश्वशांती महायज्ञाचा आरंभ केला. त्यांनी विज्ञानाच्या शक्तिरूप हातात अध्यात्माच्या हृदयातला करुण रस सोपवला आहे. यातून विश्वशांती घडावी हे त्यांचे स्वप्न आता सत्यात उतरतांना दिसत आहे. डॉ. महेश थोरवे म्हणाले, विश्वशांती या संकल्प यात्रेचे शांतीदूत म्हणजे विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड आहेत. त्यांचा एकूणच प्रवास ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्म या तत्वमालेशी संवाद साधणारा आहे. त्यांनी रामेश्वर रुई या जन्मगावी बौद्ध विहार, मुस्लिम बांधवांसाठी मशीद उभारली, रामसेतू बांधला तसेच आता विश्वधर्मी मानवतातीर्थ भवनाची उभारणी केली आहे. त्यांचे हे कार्य अद्वितीय आहे. लेखक लक्ष्मण सूर्यभान घुगे म्हणाले,जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने एक विशिष्ट मार्गावरुन धावत आहे. याच महामार्गावरून प्रवास करताना प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांनी या वेगाला दिशा देणारा आत्मा नेमका कुठे आहे याचे मर्म जाणले. आयुष्यात परिवर्तन घडवून ज्ञानाची अद्भुत मंदिरं उभे केली. शिक्षण संस्था हे ज्ञान, विज्ञान आणि अध्यात्माची प्रयोगशाळा म्हणून उभी केली. त्यांनी सर्व धर्मातल्या माणसांना माणुसकीच्या सुंदर धाग्यांनी आणि स्वर बंधाने जोडले आहे. योगेश पारखी यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# लातूर पोलिसांचे विशेष पथकाचे यश - ३४ वर्षांपासून फरार घरफोडी आरोपीस अटक.

लातूर :- लातूर शहर पोलीसांच्या विशेष पथकाने ३४ वर्षांपासून न्यायालय व पोलीस प्रशासनास गुंगारा देणाऱ्या घरफोडी गुन्ह्यातील आरोपीस अटक करून न्यायालयात हजर केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आरसीसी क्र. १८०/१९९१, डी.एफ. क्र. ५७/२०१४ तसेच गुरक्र. ८५/२००० कलम ४५७, ३८० भा.दं.वि. अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपी =ख बालाजी हरीभाऊ सरवदे (वय ५८ वर्ष, रा. वालेनगर, लातूर, ह.मु. सेलू ता. औसा, जि. लातूर)

याने १९९१ साली झालेल्या घरफोडी प्रकरणानंतर सतत वास्तव्याचे ठिकाण बदलत राहून पोलिस व न्यायालयास चकवा देत होता अनेक वर्षे शोधकार्य करूनही आरोपी सापडत नव्हता. दि.०१मार्च१९९१रोजीआरोपीवत्याचेतीनसाथीदारांनी फिर्यादी फुलचंद रामराव सूर्यवंशी (रा. कोल्हेनगर, लातूर) यांच्या घराचे कुलूप तोडून घरफोडी केली होती. फिर्यादी हे दि. २७ फेब्रुवारी १९९१ रोजी सकाळी १० वाजता औरंगाबाद येथे कामानिमित्त गेले होते व २८ फेब्रुवारी १९९१ रोजी सायंकाळी घरी परतल्यावर घरफोडी झाल्याचे त्यांना आढळले.घरातून फिलिप्स कंपनीचा टेप रेकॉर्डर, सोन्याच्या काड्या - ४० ग्रॅम वजनाच्या,लहान मुलाचा सोन्याचा करदोरा - ६० ग्रॅम वजनाचा चांदीची चैन व जोड,बॅटरी,५० रुपयांच्या २० नोटा (रु. ३५००/-) एकूण रु. ३५८०/- किंमतीचा ऐवज चोरीस गेला होता. या प्रकरणी गांधी चौक पोलीस स्टेशन, लातूर येथे गुन्हा क्र. ५०/१९९१ कलम ४५७, ३८० भा.दं. वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अनेक वर्षांच्या शोधानंतर पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे यांना गोपनीय माहिती मिळाली की आरोपी बालाजी सरवदे हा आपल्या सासरवाडीत सेलू (ता. औसा, जि. लातूर) येथील झोपडपट्टी भागात वास्तव्य करत आहे. त्यानुसार मिळालेल्या माहिती पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री.मंगेश चव्हाण यांना कळविण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून आरोपीस त्याच्या सासरवाडीतून ताब्यात घेतले.

यानंतर आरोपीला दि. ०९ नोव्हेंबर २०२५ रोजी अटक करण्यात आली. आरोपीस योग्य पोलिस बंदोबस्तात मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता मा. न्यायालयाने आरोपीस दि. २२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात पथकातील सपोनि श्री. मनाळे पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे, राजेश्वर कांदे, योगेश गायकवाड श्रीकांत कुंभार यांनी केली आहे.

७ महत्त्व :

सदर आरोपीवर ३४ वर्षांपूर्वी गुन्हा दाखल असूनही तो इतक्या दीर्घकाळ फरार राहिला होता. लातूर पोलिसांच्या सततच्या प्रयत्नामुळे आणि गोपनीय माहितीच्या आधारे हा जुना प्रकरणातील फरार आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात आला. ही कारवाई लातूर पोलिसांच्या गुन्हे शोध क्षमतेचे उत्तम उदाहरण आहे.

# ही लढाई तिकिटाची नाही महापुरुषांचे विचार जिवंत ठेवण्याची आहे - काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंके

लातूर :- प्रा. डॉ.शिवाजीराव जवळगेकर हे काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते असून पुरोगामी विचाराचे आहेत. वाजवून सभा घेऊन उमेदवारी कशी मागायची हे त्यांनी लातूरला दाखवून दिले आहे. लातूर मनपा निवडणुकीत तिकीट कुणालाही मिळो, ही लढाई तिकिटाची नसून महापुरुषांचे विचार जिवंत ठेवण्याची आहे. असे प्रतिपादन काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी येथे मांडले. लातूर शहरातील प्रभाग १३ मधील प्रकाशनगर येथील श्री दत्त मंदिराच्या सभागृहात प्रा. शिवाजीराव जवळगेकर व मित्र परिवाराच्या वतीने ९ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, शहर जिल्हाध्यक्ष ऍड. किरण जाधव, मनपा प्रभाग संपर्क प्रमुख सूर्यकांत कातळे, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ. दिनेश नवगिरे यांच्या सत्कार सोहळ्यात अभय साळुंके बोलत होते. यावेळी माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब देशमुख, माजी नगरसेविका श्रीमती कमलताई सोमवंशी,स्वाती जवळगेकर, ऍड. विजय गायकवाड, किरण जाधव, माजी नगरसेवक धोंडीराम यादव, युवक काँग्रेचे नेते सतीश साळुंके, मुन्ना शिंदे,स नालंदा ट्रस्टचे उत्तमराव कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. अभय साळूंके यांनी आपल्या भाषणात मनुवादी धर्म मार्तंडानी सव्वा लाख लिंगायत समाजाच्या लोकांची बसवेश्वरांच्या काळात हत्या केली..आणि लिंगायत समाजातील बहुसंख्य लोकं त्याचं विचाराच्या भाजपात आहेत. काँग्रेस हा सर्व सामान्यांचा पक्ष आहे. त्यामुळे काँग्रेसलाच मतदान करणे गरजेचे आहे. काँग्रेचे शहर जिल्हाध्यक्ष ऍड. किरण जाधव म्हणाले, प्रा. शिवाजीराव जवळगेकर सरांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे..त्यांनी वाजवून उमेदवारी मागत आहेत. त्यांचे काँग्रेस साठी मोठे योगदान आहे. प्रभाग १३ मध्ये काँग्रेसने जेवढी कामे केली तेवढी कोणीही केलेली नाहीत. काँग्रेस चे प्रदेश सरचिटणीस डॉ. नवगिरे यांनी साद्या सोप्या भाषेत काँग्रेस काय आहे, ते सांगितले. प्रारंभी प्रास्ताविकपर भाषणात प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांनी मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवणुकीत योग्य, निष्ठावंत, इमानदार कार्यकर्त्याला उमेदवारी मिळत नाही.. भांडण करणाऱ्या आक्रमक कार्यकर्त्याला उमेदवारी मिळते. याबद्दल नाराजी व्यक्त केली. शिवाय प्रभाग १३ मध्ये नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या साठी रुग्णालयाची आवशक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. ४० वर्षांपासून इमानदारीने काँग्रेस पक्षात काम केले. इमानदार कार्यकर्त्याला संधी, न्याय मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या सत्कार कार्यक्रमाला प्रभाग १३ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण कांबळे यांनी केले तर अशोक देडे यांनी आभार मानले.




# ज्वेल ऑफ नवी मुंबई - लॉर्ड बुद्धा पार्क येथील सुशोभीकरण व सोयी सुविधांची पूर्तता करण्यासंदर्भात आयुक्तांना निवेदन

नवी मुंबई / के. एच. हनवते :- ज्वेल ऑफ नवी मुंबई - लॉर्ड बुद्धा पार्क या ठिकाणी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची भव्य अशी मूर्ती स्थापन करण्यात आलेली आहे. नवी मुंबईच नाहीतर जवळपासच्या सर्व परिसरातून या पार्कला भेटी देण्याकरिता अनेक अनुयायी आणि नागरिक येत असतात. परंतु या उद्यानात काही सोयी अपुऱ्या पडत आहेत. त्याकडे महानगरपालिका आयुक्तांचे लक्ष वेधण्याकरिता आणि येथील अपुऱ्या सोयी पूर्ण करण्याकरिता आणि समस्यांचे निराकरण करण्याकरिता नवी मुंबई येथील बौद्ध समाज आणि नागरिक यांनी मिळून, एक निवेदन तयार करून नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना दिले आहे. सदर निवेदनात पुढील मागण्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

१) तथागतांच्या मूर्तीवर शोभिवंत छत्रीची व्यवस्था लवकरात लवकर करावी. कारण (फायबर मूर्ती असल्यामुळे गर्मीने मूर्तीला फोडी येत आहेत आणि तडे जात आहेत).

२) मूर्ती चबुतरा या ठिकाणी हत्ती पशु प्राणी व शोभिवंत फुलझाडी देखावा करण्यात यावा.

३) मूर्तीच्या समोर फायबर ट्रान्सफर पत्रा शेडची व्यवस्था करावी, (जेणेकरून साधक समोर बसून ध्यान साधना किंवा छोटे-मोठे कार्यक्रम करतील).

४) मूर्ती शेजारी कायमस्वरूपी स्टेजची व्यवस्था करावी.

५) मूर्तीच्या आसपास सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यात यावी.

६) मूर्तीच्या शेजारी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

७) बाजूच्या परिसरात सुलभ सौच्छालयाची व्यवस्था करावी.

८) एक खोली त्यात हमेशा १०० / ५० खुर्च्या आणि साऊंड सिस्टम असावे (जेणेकरून कार्यक्रम स्थळी ते घेऊन वापरण्यात येईल.

९) मूर्तीच्या आसपास सदैव सुरक्षा गार्डची नियुक्ती करावी.

१०) मूर्तीची साफसफाई म्हणून एक धम्म सेवकांची नियुक्ती करावी.

११) बौद्ध-आंबेडकरी समाजासाठी बेलापूर तालुक्यात भूखंड उपलब्ध करून सुसज्ज डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात यावे.

लॉर्ड बुद्धा पार्क येथील सुशोभीकरण लवकरात लवकर करण्यात येईल व तेथील अपुऱ्या सोयी सुविधा परिपूर्ण केल्या जातील, असे आश्वासन महापालिका आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी सदर निवेदन स्वीकारताना निवेदकांना दिले. सदर निवेदन देताना मोठ्या संख्येने अनुयायी व नागरिक उपस्थित होते. विशेषतः लॉर्ड बुद्धा कल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते, तसेच नेरूळ कामगार युनियन अध्यक्ष कोंडीबा हिंगोले, घर हक्क संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलाश सरकटे, चर्मकार समाज संघाचे अध्यक्ष गोविंद वेताळ आणि पंचशील सामाजिक संस्थेच्या महिला अध्यक्षा शालिनीताई औचार यांची प्रमुख उपस्थिती होती.




# नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीसाठी काँग्रेसकडे इच्छुकांची झुंबड!

लातूर:औसा,अहमदपूर,उदगीर,निलंगानगरपरिषदवरेणापूरनगरपंचायतीसाठीसोमवारीकाँग्रेस भवनात मुलाखत देण्यासाठी इच्छुकांची मोठी झुंबड उडाली. लातूर जिल्हा निवड समितीमार्फत सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या इच्छुकांच्या मुलाखती रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या. खा.डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख, जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे शहर जिल्हाध्यक्ष किरण जाधव, निरीक्षक अलका राठोड, धनंजय राठोड, प्रदेश सचिव श्रीशैल उटगे, ड. समद पटेल, कल्याण पाटील,एन.आर.पाटील व डॉ. दिनेश नवघरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आज लातूर जिल्हा काँग्रेसची निवड समिती बैठक काँग्रेस भवन येथे संपन्न झाली. यावेळी या निवड समितीच्या मार्फत औसा, निलंगा, अहमदपूर, उदगीर नगर परिषदेसाठी व रेणापूर नगर परिषदेसाठी इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी उमेदवारांच्या गर्दीने काँग्रेस भवन अक्षरशः बहरून गेले होते. सर्व मुलाखती अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. उदगीर नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष पदासाठी दोन आणि नगरसेवकांच्या २० जागेसाठी ५४ जणांनी मुलाखत दिली. अहमदपूर नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष पदासाठी दोन जणांनी तर २५ जागेसाठी ५६ उमेदवारांनी मुलाखत दिली. निलंगा येथील नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवारांनी तर २३ नगरसेवक पदासाठी ८३ जणांनी मुलाखत दिली. रेणापूर नगरपंचायतीसाठी नगराध्यक्ष पदासाठी ९ जणांनी तर १७ नगरसेवक पदासाठी ८६ जणांनी मुलाखत दिली. रेणापूर नगरपंचायत व निलंगा नगर परिषदेसाठी कार्यकर्त्यांनी अक्षरशः रांगा लावून काँग्रेस भवन लातूर येथे मुलाखत तिचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी कार्यकर्त्यांचा उत्साह दिसून आला. अशात महाविकास आघाडी औसा नगर परिषदेसाठी महाविकास आघाडी स्थापन झाली असून काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आघाडी झाली असून काँग्रेस साठी १४ जागांसाठी २५ जणांनी मुलाखत दिली असून नगराध्यक्ष पदासाठी ३ जणांनी मुलाखत दिली आहे. महाविकास आघाडीमध्ये शिवसेनेला ७ जागा आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला ३ जागा सोडण्यात आले आहेत.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.